# एलआयसीची 'आयएलॲण्डएफएस'बरोबर भागीदारी

## पायाभूत सुविधा विकासासाठी करार; फंडातील २५.९ टक्के हिश्श्याची खरेदी

सकाळ न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसीने 'आयएलॲण्डएफएस'च्या पायाभूत सुविधा विकासासाठी असलेल्या इन्फ्रा डेट फंडात भागीदारी केली आहे. एलआयसीच्या समावेशामुळे 'आयएलॲण्डएफएस'ने नवा इन्फ्रा डेट फंड तयार करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी दोन्ही कंपन्यांत सामंजस्य करारही नुकताच करण्यात आला आहे.

एलआयसीने आयएलॲण्डएफएसच्या या फंडातील २५.९ टक्के हिस्सा खरेदी केला आहे. आयएलॲण्डएफएस ही पायाभूत सुविधांचा विकास करणारी संस्था आहे. देशातील मोठ्या बँका आणि वित्तसंस्था याच्या भागधारक आहेत. त्यामध्ये आता एलआयसी सर्वांत मोठी भागधारक ठरली आहे. 'आयएलॲण्डएफएस'कडून पायाभूत सुविधा प्रकल्पांचे व्यावसायिकीकरण केले जाते. सरकारी व खासगी पायाभूत सुविधा प्रकल्प व्यावसायिकदृष्ट्या योग्य आहेत की नाही, हे पाहून त्या प्रकल्पांना चालना दिली जाते. अशा प्रकल्पांना ही संस्था प्रकल्पाच्या विविध स्तरांवर वित्तपुरवठ्याचा बंदोबस्त करते. त्यामध्ये इन्व्हेस्टमेंट बँकिंग, प्रोजेक्ट फायनान्सिंग, निधी एकत्रीकरण व सल्लागार सेवांचा प्रामुख्याने समावेश असतो. यासाठीच आयएलॲण्डएफएसने स्वतःचा इन्फ्रा डेट फंड तयार केला आहे.



भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसी आणि आयएलॲण्डएफएस यांच्यात नवा इन्फ्रा डेट फंड तयार करण्यासाठी नुकताच सामंजस्यकरार करण्यात आला.

देशाची आर्थिक प्रगती वेगाने होत असली तरी त्या मानाने पायाभूत सुविधांचा विकास झपाट्याने झालेला नाही. त्यामुळे केंद्र सरकारने प्राधान्याने पायाभूत विकास करण्यावर भर दिला आहे.

'आयएलॲण्डएफएस'मधील हिस्सा खरेदी करून एलआयसीने भागीदारी स्थापन केल्यामुळे या दोन्ही कंपन्यांनी एकत्र येत नवा इन्फ्रा डेट फंड तयार करायचे ठरविले आहे. त्यासाठी दोन्ही कंपन्यांमध्ये सामंजस्य करार झाला आहे. त्यानुसार एलआयसी व आयएलॲण्डएफएस देशांतर्गत, तसेच परदेशातील पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करतील. या दोन्ही कंपन्यांनी मिळून दोन अब्ज अमेरिकी डॉलरचा इन्फ्रा डेट फंड तयार करायचे ठरविले आहे.